महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक **लोकनेता**

आवाज जनतेच्या मनातला!

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सस्नेह निमंत्रण

# तिसरा वर्धापन दिन सोहळा विशेषांक

रविवार दि.१० मे २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २६४ | किंमत २ रुपये | 7499615933

# दैं.लोकनेता वर्धापन दिन नव्हे सत्यासाठी झगडणाऱ्या लेखणीचा विजय सोहळा...!

तीन वर्षांपूर्वी एक स्वप्न उराशी बाळगून दैनिक लोकनेताचीची मुहूर्तमेढ रोवली गेली सत्तेच्या दारात उभं राहण्यासाठी नाही, तर सामान्य माणसाच्या दारात न्याय पोहोचवण्यासाठी!आज १० मे दैनिक लोकनेता आपल्या संघर्षमय, निर्भीड आणि लोकहिताच्या पत्रकारितेची यशस्वी तीन वर्षे पूर्ण करत आहे. हा केवळ वर्धापन दिन नाही, तर सत्यासाठी झगडणाऱ्या लेखणीचा विजय सोहळा आहे. तीन वर्षांपूर्वी बीडच्या मुरमाड मातीत रोवलेले बीज आज बीड सह दहा ते बारा जिल्ह्यांमध्ये दिमाखात आपली लेखणी सामान्यांच्या प्रश्नांसाठी झिजवत आहे. खऱ्या अर्थाने एका सामान्य कुटुंबातील युवकाने दैनिक चालवणे तर दूर पण चालवण्याचा विचार करणेही आमच्या साठी कठीणच होते.कारण इथल्या व्यवस्थे सोबत झगडणे व टिकणे पाहिजे तेवढं सोपं नाही. गेल्या तीन वर्षांत आम्ही अनेक वादळं पाहिली दबाव आले, संकटं आली, अडथळे आले पण लोकनेताची लेखणी कधीच झुकली नाही! कारण आमची ताकद कोणतीही सत्ता नाही आमची ताकद आहे जनतेचा विश्वास, वाचकांचे प्रेम आणि प्रतिनिधींची साथ. शेतकऱ्यांच्या बांधावरून ते मंत्रालयाच्या दालनापर्यंत, गरीबांच्या हक्कांपासून ते अन्यायाविरोधातील आवाजापर्यंत, दैनिक लोकनेताने नेहमीच सामान्य माणसाची बाजू निर्भीडपणे मांडली. पत्रकारिता म्हणजे फक्त बातम्या छापणे नाही तर समाजातील अन्यायावर प्रहार करणे, सत्याला शब्द देणे आणि जनतेचा आवाज बनणे! हीच भूमिका आम्ही पहिल्या दिवसापासून जपली आणि पुढेही जपणार आहोत. आज या वर्धापन दिनानिमित्त मी आमच्या सर्व वाचकांना, पत्रकारांना, प्रतिनिधींना, जाहिरातदारांना आणि हितचिंतकांना मनःपूर्वक सलाम करतो.तुमच्या प्रेमामुळे दैनिक लोकनेता हे फक्त वृत्तपत्र राहिले नाही, तर जनतेच्या मनातील विश्वासाचे व्यासपीठ बनले आहे.  आमची लेखणी विकली जाणार नाही आमचा आवाज दाबला जाणार नाही आणि जनतेसाठी लढण्याची आमची जिद्द



ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे
मुख्य संपादक

कधीही संपणार नाही! आता प्रवास आणखी मोठा आहे .ध्येय आणखी उंच आहे .आणि लोकनेताचा आवाज आता अधिक ताकदीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घुमणार आहे! सत्यासाठी लेखणी जनतेसाठी संघर्ष आणि अन्यायाविरोधात कायम आक्रमक भूमिका! हीच दैनिक लोकनेताची ओळख. तीन वर्षांचा हा प्रवास नक्कीच खडतर होता पण हे सगळं शक्य झालं ते फक्त आणि फक्त आमचा वाचक वर्ग तसेच आमच्या प्रतिनिधींच्या मेहनतीमुळे.

## ध्येय तेच.. ध्यास नवा.. विश्वास नवा..








दैनिक लोकनेता
वर्धापन दिन सोहळा
हार्दिक शुभेच्छा
ग्रामपंचायत अधिकारी
मा. दादासो मारुती गावडे
उपसरपंच
सौ. अश्विनी बाळू येडे
माजी सरपंच
दादासो जाधव
* ग्रामपंचायत सदस्य *
श्री.संतोष तानाजी चवरे,
श्री.आप्पासो सोपान गावडे,
श्री. तात्याराम महादेव डोंबाळे,
* ग्रामपंचायत सदस्या *
सौ. संगीता महादेव गावडे,
सौ. स्वाती नितीन शिंगाडे,
सौ. स्वाती रोहिदास गावडे,
सौ. वैशाली बापूराव आवटे
* ग्रामपंचायत कर्मचारी *
श्री. भागवत पोपट गावडे,
श्री. मधुकर विठ्ठल मोहिते,
श्री. अजय अंकुश मोहिते.
शुभेच्छूक:- ग्रामपंचायत कडबनवाडी कर्मचारी व ग्रामस्थ.



दैनिक लोकनेता
वर्धापन दिन
हार्दिक शुभेच्छा
डॉ. निलेश गुलाब शिंगाडे
मा.किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष भाजपा,
मा.सरचिटणीस इंदापूर भाजपा,
ग्रामपंचायत सदस्य शेळगाव.


अखंड सेवेची ५० वर्ष
सिमा मशनरी अँड कृषी सेवा केंद्र
खरवंडी कासार
अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
प्रो.प्रो.महादेवराव किसनराव दराडे


अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
आवाज जनतेच्या मनातला!
:: शुभेच्छुक ::
श्री.सुनिल अक्रूर वाघ
ग्रामपंचायत अधिकारी एकनाथवाडी


अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक :
श्री.माणिकराव रामराव बटुळे
सरपंच भारजवाडी


जय माता दी स्टोन क्रेशर
कारेगाव/तुळजवाडी ता. पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर
अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
:: शुभेच्छुक ::
प्रोप्रा.श्री.भगवानराव दराडे
मु.पो.तिनखडी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर


अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
श्री.भगवान भाऊ हजारे
सरपंच मिडसांगवी


अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक लोकनेता
वर्धापन दिना निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
मा.प्रदीप पाटील अंदुरे
सरपंच खरवंडी कासार




# अन्यायाविरुद्ध लढणारी निर्भीड लेखणी
# दैनिक लोकनेता : एक जनआंदोलन

**वर्धापन दिन हा केवळ कालगणनेतील एक टप्पा नसतो; तो एखाद्या विचारप्रवाहाचा, तत्त्वनिष्ठ वाटचालीचा आणि समाजाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा उत्सव असतो. दैनिक लोकनेता चा तिसरा वर्धापन दिन म्हणजे अशाच एका निर्भीड, जाज्वल्य आणि जनहितासाठी झटणाऱ्या पत्रकारितेच्या प्रवासाचा अभिमानाचा क्षण आहे.ही केवळ वर्षांची मोजदाद नाही, तर सत्यासाठी पेटलेल्या लेखणीची, अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या आवाजाची आणि सामान्य माणसाच्या विश्वासाची जपणूक करणारी गाथा आहे.**

अन्यायाविरुद्ध लढणारी निर्भीड लेखणी या आपल्या ब्रीदवाक्याला न्याय देत दैनिक लोकनेता ने महाराष्ट्रातील वार्ताहारांसाठी एक सशक्त, सन्माननीय आणि धैर्य देणारे व्यासपीठ उभे केले आहे. आज या माध्यमातून असंख्य पत्रकार अन्यायाच्या अंधाराला छेद देत, सत्याचा दीप प्रज्वलित करत आहेत. ही लेखणी केवळ शाईने नव्हे, तर जिद्दीने, तळमळीने आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीने ओतप्रोत भरलेली आहे.मुखेड शहरासह तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांप्रदायिक वास्तव समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य दैनिक लोकनेता सातत्याने करत आहे. गावोगावी दडलेल्या वेदना, उपेक्षितांचे अश्रू, शेतकऱ्यांची हतबलता, तरुणांच्या स्वप्नांची धडपड-या सर्वांना शब्द देण्याचे, त्यांना न्याय मिळवून देण्याचे ध्येय या वृत्तपत्राने अंगीकारले आहे. म्हणूनच लोकनेता आज केवळ एक वर्तमानपत्र नाही, तर जनतेचा हक्काचा आवाज बनला आहे.या यशस्वी वाटचालीमागे उभे असलेले प्रेरणास्थान म्हणजे संपादक मा. ज्ञानेश्वर मुंडे. त्यांनी लोकनेता च्या प्रत्येक प्रतिनिधीला केवळ सहकारी न मानता, कुटुंबातील सदस्य म्हणून जपले आहे. त्यांच्या या आत्मीयतेमुळेच प्रत्येक वार्ताहार उत्साहाने, निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत आहे. पत्रकारितेतील कठोर परिश्रम, धैर्य आणि प्रामाणिकतेचे मूल्य जाणणारे संपादक म्हणून त्यांनी एक वेगळी परंपरा रुजवली आहे.वर्धापन दिनाच्या निमित्ताने उत्कृष्ट पत्रकारितेसाठी वार्ताहारांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेणे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे-ही केवळ औपचारिकता नसून, ती प्रेरणेची अखंड ज्योत आहे. अशी संस्कृती जपणारे दैनिक लोकनेता हे खऱ्या अर्थाने पत्रकारितेचे विद्यापीठच म्हणावे लागेल.आज बेधडक आणि निर्भीड बातम्यांमुळे समाजात नावलौकिक मिळवत लोकनेता यशाच्या शिखराकडे वेगाने वाटचाल करत आहे. तिसरा वर्धापन दिन हा केवळ एक सोहळा नसून, तो या यशोगाथेचा साक्षीदार आहे. नियोजनबद्ध, दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणारा हा सोहळा प्रत्येक सदस्यासाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणे, लोकनेता परिवाराचा भाग असणे-हे खरोखरच भाग्याचे लक्षण आहे. कारण येथे प्रत्येक शब्दाला अर्थ आहे, प्रत्येक बातमीमागे जबाबदारी आहे आणि प्रत्येक लेखणीत परिवर्तनाची ताकद आहे.भविष्यातही ही निर्भीड लेखणी अशीच अन्यायाच्या विरुद्ध पेटत राहो, सत्याचा मार्ग उजळत राहो आणि समाजाच्या परिवर्तनाची मशाल उंचावत राहो-हीच सदिच्छा!दैनिक लोकनेता च्या उज्ज्वल, प्रेरणादायी आणि यशस्वी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!



संजय यलमवाड
दैनिक लोकनेता
प्रतिनिधी मुखेड












# तिसरा वर्धापन दिन सोहळा विशेषांक
























श्रध्दास्थान



कै.व्यंकटराव पाटील कवळे

प्रेरणास्थान



कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर

## व्हि.पी.के.पतसंस्था

कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या.सिंधी

मुख्य कार्यालय : कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, नविन मोंढा कमान नं.२, नांदेड. फोन : ०२४६२-२९५५९० E-mail : vpkho.nanded@gmail.com

✲ रजि नं.NND/BKR/BNK/0/1360-2002 ▪ ISO 9001-2015 नामांकन मिळालेली संस्था ✲

### विविध ठेव योजना

**ठेवीवरील आकर्षक व्याजदर**

| | |
|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ७.००% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते १२ महिने | ९.००% |
| १२ महिने १ दिवस ते २४ महिने | १०.००% |

जेष्ठ नागरिक, विधवा महिला, अनाथ मुली मुले व अपंगासाठी ठेवीवर ०.५०% ज्यादा व्याज दर

**लखपती ठेव योजना :-**
रू.१४५०/- दर महा ५५ महिने भरा व रू.१ लाख व्याजासह मिळवा.

| | | |
|---|---|---|
| १४५०/- दरमहा | ५५ महिने | १,००,०००/- |
| २९००/- दरमहा | ३० महिने | १,००,०००/- |
| ५८००/- दरमहा | १६ महिने | १,००,०००/- |

**धनवर्धनी ठेव योजना :-**
रू.१ लक्ष गुंतवा आणि ८० महिण्यात रू.२ लक्ष मिळवा.
(ज्येष्ठ नागरीकांसाठी ७७ महिने.)

**विशेष मुदत ठेव योजना**

| कालावधी | गुंतवणुक | व्याजदर | गुंतवणुक | व्याजदर |
|---|---|---|---|---|
| ३१ दिवस | १,००,०००/- | ७.२५% | ३,००,०००/- | ७.५०% |
| ४६ दिवस | १,००,०००/- | ८.२५% | ३,००,०००/- | ८.५०% |
| ९० दिवस | १,००,०००/- | ९.००% | ३,००,०००/- | ९.२५% |
| १८२ दिवस | १,००,०००/- | ९.२५% | ३,००,०००/- | ९.७५% |
| ३९५ दिवस | १,००,०००/- | १०.००% | ३,००,०००/- | १०.५०% |

**मासिक ठेव योजना :-**
रू.१ लाख १८ महिने कालावधीसाठी गुंतवा व दर महा रू.८७५ व्याज मिळवा.

| | | |
|---|---|---|
| ५०,००० | १८ महिने | ४३७ रू. दर महा |
| १,००,००० | १८ महिने | ८७५ रू. दर महा |
| ५,००,००० | १८ महिने | ४३७५ रू. दर महा |
| ५,७२,००० | १८ महिने | ५००५ रू. दर महा |

500 कोटी कडे वाटचाल आपल्याच सहकार्याने..!

▪ सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'

- कोर बँकींग व SMS सुविधेसह संपुर्ण बँकींग व्यवसाय.
- RTGS, NEFT सुविधा.
- मौल्यवान वस्तु ठेवण्यासाठी सर्व शाखेत लॉकर्स सुविधा.
- मीनी ATM सुविधा



**कर्ज योजना :-**
▸ सोने तारण ▸ माल तारण ▸ मुदतठेव तारण ▸ व्यवसायिक कर्ज
▸ नजरगहाण ▸ पतमर्यादा ▸ महिला बचतगट ▸ दुध व्यवसाय कर्ज

**सामाजिक उपक्रम :-**
- आपत्तीग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत.
- वृक्षारोपन व पाणी आडवा पाणी जिरवा जलसंधारणाचे काम.
- गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक साहीत्यांचे वाटप



-: संस्थापक अध्यक्ष :-
श्री मारोतराव व्यंकटराव पा.कवळे
(गुरूजी) सिंधीकर

-✲ शाखा संपर्क ✲-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरी मेन | : 7263012372 | नायगांव | : 7263012377 | छ.चौक, नांदेड | : 8956784612 | हदगांव | : 8956784617 |
| सिंधी | : 7263012373 | नरसी | : 7263012378 | अर्धापूर | : 8956784613 | मारतळा | : 8956784618 |
| कारेगांव | : 7263012374 | भोकर | : 7263012379 | देगलूर | : 8956784614 | लोहा | : 8956784619 |
| उमरी शहर | : 7263012375 | मुदखेड | : 7263012380 | मुखेड | : 8956784615 | हिमायतनगर | : 8956784620 |
| नांदेड | : 7263012376 | धर्माबाद | : 7263012381 | तामसा | : 8956784616 | रविनगर, नांदेड | : 8956784621 |

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

# मराठवाडा-तेलंगणाला जोडणाऱ्या लातूररोड-मुखेड-बिलोली-बोधन रेल्वेमार्गाला गती:१३४ किमी मिसिंग लिंकसाठी २४३० कोटींचा खर्च, अलाइनमेंट निश्चित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संजय यलमवाड**

मराठवाडा आणि तेलंगणा राज्यांना थेट जोडणाऱ्या लातूररोड-जळकोट-मुखेड-बिलोली-बोधन या बहुप्रतिक्षित रेल्वेमार्गाच्या हालचालींना आता वेग आला आहे. या १३४.५५ किमी लांबीच्या 'मिसिंग लिंक' रेल्वेमार्गाची अलाइनमेंट म्हणजेच मार्गरेषा निश्चित झाली असून, भारतीय रेल्वेच्या अद्ययावत नकाशामध्ये या प्रस्तावित मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या या प्रकल्पाबाबत जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**अंतिम स्थान सर्वेक्षणाला मंजुरी**

रेल्वे मंत्रालयाने या मार्गासाठी अंतिम स्थान सर्वेक्षण म्हणजेच फायनल लोकेशन सर्व्हेला मंजुरी दिली आहे. दक्षिण मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, लातूररोड-जळकोट-मुखेड-नर्सी-बिलोली-बोधन या १३४.५५ किमी लांबीच्या प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे २४३० कोटी रुपये आहे.

**मराठवाड्याला मिळणार थेट तेलंगणा संपर्क**



हा रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास मराठवाड्यातील लातूररोड, जळकोट, मुखेड, नर्सी, बिलोली या तालुक्यांना तेलंगणातील बोधनमार्गे निजामाबाद, हैदराबादपर्यंत थेट रेल्वे संपर्क मिळणार आहे. सध्या या भागातील प्रवाशांना नांदेड किंवा उदगीरमार्गे वळसा घालून जावे लागते. नवा मार्ग झाल्यास वेळ आणि पैशांची मोठी बचत होणार आहे.

**औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना**

लातूररोड-मुखेड-बोधन हा रेल्वेमार्ग 'मिसिंग लिंक' म्हणून ओळखला जातो. या मार्गामुळे नांदेड, लातूर जिल्ह्यातील हळद, सोयाबीन, कापूस, केळी या शेतमालाची वाहतूक सुलभ होऊन शेतकऱ्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. मुखेड, बिलोली, बोधन परिसरातील व्यापाऱ्यांना मुंबई विशाखापटन्म बंदराशी थेट जोडणी मिळाल्याने निर्यातीला चालना मिळेल. याशिवाय शैक्षणिक व आरोग्य सुविधांसाठी हैदराबादला जाणाऱ्या रुग्ण व विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे.

**नकाशात समावेशामुळे नागरिकांत आनंद**

भारतीय रेल्वेच्या अधिकृत अद्ययावत नकाशात या प्रस्तावित मार्गाचा समावेश झाल्याने हा प्रकल्प केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात येईल, असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. अनेक सामाजिक संघटना व रेल्वे कृती समित्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गासाठी पाठपुरावा केला होता.

**पुढील प्रक्रिया काय?**

अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचा सविस्तर अहवाल उझठ रेल्वे बोर्डाकडे सादर होईल. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, निधीची तरतूद व भूसंपादन प्रक्रिया सुरू होईल. लोकप्रतिनिधींनी या कामासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करावी, अशी मागणी होत आहे.

**प्रतिक्रिया :** हा मार्ग केवळ रुळ नाही, तर मराठवाड्याच्या विकासाची जीवनवाहिनी आहे. तेलंगणाशी थेट जोडणी झाल्यास रोजगार, उद्योग व व्यापार वाढेल, अशी भावना मुखेडच्या नागरिकांनी व्यक्त केली.

**प्रकल्प एका दृष्टीक्षेपात**

**मार्ग: लातूररोड-जळकोट-मुखेड-नर्सी-बिलोली-बोधन**
**लांबी: १३४.५५ किमी**
**अंदाजित खर्च: २४३० कोटी रुपये**
**फायदा: मराठवाडा-तेलंगणा थेट कनेक्टिव्हिटी, मालवाहतूक, प्रवासी सोय**
**सद्यस्थिती: अलाइनमेंट निश्चित, अंतिम सर्वेक्षण मंजूर**

# माध्यमिक विद्यालय मालेवाडीचा दहावीचा निकाल १०० टक्के; खरवंडी परिसरात यशाची परंपरा कायम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या सन २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षेत माध्यमिक विद्यालय मालेवाडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर या विद्यालयाने शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील २६ पैकी २६ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले असून खरवंडी परिसरात मालेवाडी विद्यालयाने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.



विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण संपादन करत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे. परीक्षेत प्रथम पाच क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत -

१) कोमल नानाभाऊ खेडकर - (८९.६० टक्के)
२) कांचन नानासाहेब राख (८९.२० टक्के)
३) जयेश अजिनाथ वारे (८८.६० टक्के)
४) अनिकेत बापुराव दराडे - ८७.८० टक्के
५) श्रीराम संजय दराडे ८७.२० टक्के

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. गहीनाथ पाटीलबा ढाकणे साहेब, सर्व विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक श्री. केदार सर, शिक्षक व शिक्षकेतर सेवकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

विद्यालयाच्या शंभर टक्के निकालामुळे मालेवाडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांना शेळगाव विद्यालयात विनम्र अभिवादन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेळगाव । राहुल जाधव**

शेळगाव - दि. ९ बहुजनांच्या अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे, हा विचार उराशी बाळगून 'रयत'ची मुहूर्तमेढ रोवणारे थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६७ वी पुण्यतिथी श्री संत मुक्ताबाई विद्यालय, शेळगाव (ता. इंदापूर) येथे मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.शिक्षणाची गंगा गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचवण्यासाठी कर्मवीरांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या या महान कार्याचे स्मरण करत आज विद्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी अण्णांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे



मुख्याध्यापक श्री. गावडे सर यांनी कर्मवीरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. यावेळी ग्रंथपाल श्री. खलाटे सर, वरिष्ठ लिपिक श्री. बोराटे सर, कनिष्ठ लिपिक श्री. शिर्के सर, श्री. माने आप्पा व विद्यालयातील इतर सेवक वर्ग उपस्थित होता.स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद हे वाक्य सार्थ ठरवणाऱ्या कर्मवीरांच्या विचारांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे मत यावेळी गावडे सरांनी व्यक्त केले. या छोटेखानी पण शिस्तबद्ध कार्यक्रमातून कर्मवीरांना कृतज्ञतापूर्वक मानवंदना देण्यात आली.

# एस.टी.आदिवासी आरक्षणासाठी नेमलेल्या समितीने पाच महिन्यांच्या कामाचा आढावा जाहीर करावे

## गोरसेनाचा किनवट मध्ये हला बोल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पिपंळगाव । डॉ.भारत उद्धव राठोड**

!गोरबंजारा समाजाला एस. टी. आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, हैदराबाद गॅझेट लागू करावे अशी मागण्यांसाठी गेल्या वर्षभरात महाराष्ट्रभर ५५ /६० हून अधिक महामोर्चे काढण्यात आले होते. तसेच गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेशभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली समृद्धी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर मुंबई येथे ४ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिन्दे, उपमुख्यमंत्री अजित पवार व बंजारा समाजाच्या शिष्टमंडळामध्ये

सकारात्मक चर्चा झाली होती. या चर्चेनंतर आरक्षणासंदर्भात करण्यासाठी उच्च न्यायालयाचे एस.टी. अभ्यास




माजी न्यायाधीश तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थाप्न करण्यात आली. मात्र, गेल्या पाच महिन्यांत समितीने नेमके कोणते

काम केले, कोणत्या दिशेने अभ्यास सुरू आहे, याबाबत समाजाला कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली असून समितीने आपल्या कामाचा अहवाल जाहीर करावा, अशी मागणी गोरसेनेने केलो आहे.

गोरबंजारा िलळर्शींची स्वतंत्र गोरघाटी, गोरबोली, तांडा संस्कृती, पारंपरिक राहणीमान, पेहराव, आर्थिक मागासलेपण व आदिम संस्कृतीची वैशिष्ट्ये लक्षात घेता देशातील अनेक राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही एस.टी. प्रवर्गातून समांतर आरक्षण देण्यात यावे, ही समाजाची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीसाठी आज राज्यभर

३०० पेक्षा अधिक ठिकाणी निवेदने देण्यात आली. किनवट येथे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अतुल राठोड, जिल्हा संयोजक रामराव मेघावत, आत्माराम राठोड, तालुकाध्यक्ष प्रदीप राठोड, उत्तम राठोड, टेकसिंग चव्हाण, शत्रुघ्न जाधव, सतीश चव्हाण, हृदय चव्हाण, विकास जाधव, योगेश बलराज जाधव, विनोद जाधव, महिला प्रतिनिधी ललिता रामराव मेघावत, रेश्मा खोला, सुमित चव्हाण, आशुतोष पवार, शिवपाल पवार, जाँटी जाधव, वीरू राठोड आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर उत्साहात संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

महसूल मंडळ अधिकारी यांनी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले यावेळी व सर्व विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी यांनी वेळेवर उपस्थित राहुन मोठ्या उत्साहात शिबीर संपन्न केले.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातर्फे मे २०२६ मध्ये राबविण्यात आलेल्या या शिबिरास हिमायतनगर येथील तहसिलदार पल्लवी टेमकर व सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी उपस्थित राहून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य प्रमाणपत्र, बालसंगोपन किट, सातबारा,भुविकास बॅक बोजा कमी करणे, रहिवासी,जातीचे, उत्पन्न प्रमाण पत्र विज पडुन मुत्यु पडलेल्या शेतकऱ्यांना धनादेश,संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ मंजुरी आदेश देण्यात आले शेतकऱ्यांना कृषी विषयक अवजारे देण्यात आली यावेळी कृषी विद्यापीठ पोखर्णी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ देवकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या विविध योजना व शेती विकास विषयी मार्गदर्शन केले या शिबिरास अध्यक्ष म्हणून तहसीलदार पल्लवी टेमकर तर प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून नगरसेवक विठ्ठल ठाकरे,माजी जि.प.सदस्य समद खान, संतोष मुद्देवाड, बालाजी मेंडके,मंडळ अधिकारी चव्हाण,पवार मॅडम,अनरवाड, ग्राम विकास अधिकारी रामदास,कदम, भरणे, गायकवाड,शिंदे,बिराडे,ताटेवाड,बरदेवाड,सब्बनवाड,औटे,व सर्व पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा वर्धापन दिन ५ जूनला; माहूर येथे पत्रकारांचा सन्मान सोहळा

## सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या पत्रकारांचा गौरव राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून संघटनेची स्थापना, राज्यभरातील पत्रकारांना निमंत्रण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मान्यवरांसह उत्कृष्ट पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा श्रीक्षेत्र माहूर येथे आयोजित करण्यात आला आहे.शहर व ग्रामीण भागात पत्रकारिता करताना पत्रकारांना समाजकंटकांकडून त्रास सहन करावा लागतो. तसेच सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण पत्रकारांना एक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहता यावे, या उद्देशाने राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ' या संघटनेची स्थापना करण्यात आली.



या संघाचा वर्धापन दिन येत्या ५ जून रोजी आहे. या दिवसाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन ५ जून रोजी माहूर येथे करण्यात आले आहे. उत्कृष्ट पत्रकार, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, उद्योग, अध्यात्म, कायदेविषयक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच निर्भयपणे व निःपक्षपातीपणे पत्रकारिता करणाऱ्या शहरी व ग्रामीण पत्रकारांचा यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. पत्रकार हा लोकशाहीचा खरा चौथा स्तंभ आहे. तो तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडतो. मात्र, त्याला संरक्षण व सन्मान मिळत नाही. त्यामुळे आम्ही ही संघटना उभी केली. या सोहळ्याच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल असे प्रतिपादन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले.या वर्धापन दिन व सन्मान सोहळ्याला महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बांधवांनी,तसेच महाराष्ट्रातील निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे. कार्यक्रमाची जय्यत तयारी माहूर येथे सुरू आहे.

## हंगामाच्या तोंडावर खत दरवाढीचा भडका; शेतकरी संतप्त

# नांदेड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेड आक्रमक;काळा बाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नांदेड जिल्ह्यात रासायनिक खतांच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. विविध खतांच्या किमतीत प्रतीबॅग तब्बल १२५ ते ३०० रुपयांपर्यंत वाढ झाल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले असून शासनाच्या कृषी धोरणाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

देगलूर, मुखेड, भोकर, कंधार, बिलोली, नायगाव, लोहा आदी तालुक्यांत खत विक्री केंद्रांवर शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. मात्र वाढीव दर, अपुरा साठा आणि काही ठिकाणी सुरू असलेल्या काळाबाजारामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. एकीकडे शेतीमालाला भाव नाही आणि दुसरीकडे खतांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. मग शेतकऱ्यांनी जगायचं कसं? असा संतप्त सवाल ग्रामीण भागातून उपस्थित केला जात आहे.

डीएपी, युरिया आणि मिश्र खतांच्या



दरवाढीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, यांसारख्या पिकांच्या लागवडीचा खर्च प्रचंड वाढला आहे. आधीच अवकाळी पाऊस, नापिकी, दुष्काळी परिस्थिती आणि वाढते शेती खर्च यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला असताना आता खत कंपन्या आणि काही विक्रेत्यांकडून सुरू असलेल्या मनमानीमुळे शेतकरी पूर्णपणे मेटाकुटीला आला आहे.

याबाबत संभाजी ब्रिगेड नांदेड जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे करडखेडवाडीकर यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत म्हटले की, शासनाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरू केले आहे. खत कंपन्या आणि काही विक्रेते संगनमत करून कृत्रिम टंचाई निर्माण करत आहेत. गरीब शेतकऱ्यांची खुलेआम लूट सुरू असून प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. जर तात्काळ खत दर नियंत्रणात आणले नाहीत, काळाबाजार थांबवला नाही आणि पुरेसा साठा उपलब्ध करून दिला नाही, तर संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

संभाजी ब्रिगेडने कृषी विभाग, जिल्हा प्रशासन आणि शासनाला इशारा देत खत विक्रेत्यांची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आगामी काळात शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांचे आरोग्य संरक्षण हेच आमचे मिशन-डॉ.ज्ञानेश्वर दराडे


**दैनिक लोकनेता या वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त येत्या १० मे रोजी आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात माझी महाराष्ट्र भूषण या प्रतिष्ठित सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची, समाधानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. या सन्मानासाठी दैनिक लोकनेता चे मुख्य संपादक मा. श्री ज्ञानेश्वर मुंडे यांचे व आमच्या भागातील दै. लोकनेताचे पत्रकार मित्र श्री. बाळासाहेब खेडकर यांचेही मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.**

महाराष्ट्रातील ऊसतोडणी मजूर आणि वाहतूक कामगारांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेऊन त्यांच्या सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने ठोस आणि सकारात्मक पावले उचलण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहे. नगर, बीड, संभाजीनगर, जालना तसेच संपूर्ण मराठवाडा भागातून मोठ्या प्रमाणावर ऊसतोड मजूर सहा महिने आपले घरदार सोडून कामासाठी स्थलांतर करतात. या कालावधीत त्यांना अनेक गंभीर अडचणींना सामोरे जावे लागते अपुरी राहण्याची व्यवस्था, महिलांसाठी स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव, लहान मुलांसाठी वसतिगृहांची कमतरता, ऊस वाहतुकीदरम्यान होणारे अपघात तसेच तातडीच्या आरोग्यसेवेचा अभाव. या सर्व मुद्द्यांवर शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून ठोस मागण्या मांडत आहोत.

स्थानिक मान्यवर नेत्यांचे भक्कम सहकार्य घेऊन या विषयावर प्रभावी जनआंदोलन उभारत, एक सक्षम व विश्वासार्ह आराखडा तयार करून तो शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा ठाम निर्धार आहे. हीआरोग्य चळवळ अधिक सशक्त करण्यासाठी सरकारदरबारी याची गांभीर्याने दखल घेतली जाईल, असा विश्वास आहे. महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या सक्षम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली ऊसतोडणी मजूर व कामगारांच्या आरोग्यविषयक आमच्या मागण्यांना निश्चितच न्याय मिळेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.

महाराष्ट्रभर पसरलेल्या विशेषत:भगवानगड परिसरातील ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे केवळ समस्या म्हणून नव्हे, तर सामाजिक जबाबदारी म्हणून पाहत-संरक्षण, संवर्धन आणि प्रबोधन या त्रिसूत्रीचा अवलंब करून देवनाथ फाउंडेशन च्या माध्यमातून आम्ही सातत्याने कार्यरत आहोत.या उपेक्षित व वंचित घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या आमच्या प्रयत्नांची आपण घेतलेली दखल ही केवळ सन्मान नाही, तर या कार्याला अधिक बळ देणारी प्रेरणा आहे. आपल्या या पाठबळामुळे आमच्या उपक्रमांचा विस्तार अधिक प्रभावीपणे होऊन, गरजूंपर्यंत आरोग्यसेवा व जागरूकता पोहोचवण्यास निश्चितच नवी दिशा आणि ऊर्जा मिळेल.

**डॉ.ज्ञानेश्वर दराडे**
**देवनाथ फाऊंडेशन,**
**भगवानगड परिसर**




## जनतेचा बुलंद आवाज-दैनिक लोकनेता अन्यायाविरुद्ध लढणारी निर्भीड लेखणी!

वर्धापन दिन हा कोणत्याही वृत्तपत्रासाठी केवळ औपचारिक सोहळा नसतो, तर तो आपल्या कार्याची ताकद, विश्वासार्हता आणि समाजाशी असलेले नाते अधोरेखित करणारा महत्वाचा दिवस असतो. दैनिक लोकनेता ने आपल्या निर्भीड आणि तडफदार पत्रकारितेमुळे सामान्य जनतेचा विश्वास जिंकत, समाजातील अन्यायाविरुद्ध सतत लढा दिला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यासह गडचांदूर परिसरात घडणाऱ्या विविध घटनांमध्ये दैनिक लोकनेता ने नेहमीच जनतेच्या बाजूने ठाम भूमिका घेतली आहे. शहरातील आगीच्या घटनांपासून ते प्रशासनाच्या हलगर्जीपणापर्यंत, तसेच सामान्य नागरिकांच्या समस्या उचलून धरत, त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य या वृत्तपत्राने प्रभावीपणे केले आहे. त्यामुळेच लोकनेता हे नाव आज जनतेसाठी विश्वासाचे प्रतीक बनले आहे.

पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्या छापणे नव्हे, तर समाजात बदल घडवून आणण्याची एक ताकद आहे. दैनिक लोकनेता च्या बातम्यांचा इफेक्ट अनेकदा दिसून आला आहे. एखाद्या समस्येवर बातमी प्रसिद्ध होताच प्रशासन हलते, जबाबदार अधिकारी कारवाई करतात आणि सामान्य माणसाला न्याय मिळतो - हीच खरी पत्रकारितेची ताकद आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगार युवकांचे प्रश्न, सामाजिक अन्याय आणि गरजूंच्या अडचणी यांना आवाज देत दैनिक लोकनेता ने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले कार्य हेच या वृत्तपत्राचे खरे यश आहे.

वर्धापन दिनाच्या या विशेष दिवशी, प्रत्येक पत्रकाराने आपल्या लेखणीची जबाबदारी ओळखून सत्यासाठी निडरपणे उभे राहण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. कारण एक मजबूत आणि प्रामाणिक पत्रकारिता हीच समाजाच्या विकासाची खरी दिशा ठरवते.

आज दैनिक लोकनेता केवळ एक वृत्तपत्र नाही, तर तो जनतेचा आवाज, अन्यायाविरुद्ध लढणारा एक सशक्त मंच बनला आहे. भविष्यातही हीच परंपरा अधिक ताकदीने पुढे जाईल, अशी अपेक्षा.

दैनिक लोकनेता च्या उज्वल वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

**-सिध्देश्वर केंद्रे**
**चंद्रपूर प्रतिनिधी**

## महसूल प्रशासन नागरिकांच्या दारी:छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात संपन्न




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**देगलूर । वंकलवार प्रभू**

उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर येथे आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर मोठ्या उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाले. शासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांना विविध महसूल सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

शिबिरामध्ये ७/१२ मधील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ वाटप, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र,सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, विद्यार्थ्यांना दाखले,निराधार योजना, कृषी विषयक समस्या व विविध योजनांचे माहिती व मार्गदर्शन, आधार कार्ड संदर्भात माहिती, राशनकार्ड वाटप तसेच शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची माहिती देण्यात आली. अनेक प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्यात आला.

शिबिरात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष सहकार्य केले. नागरिकांनीही शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

या शिबिरासाठी देगलूर बिलोलीचे लाडके आमदार मा . जितेश अंतापूरकर, उपविभागीय अधिकारी देगलूर श्री अनुप पाटील व तहसीलदार देगलूर श्री भरत सूर्यवंशी, देगलूर नगरपरिषद उएज, कृषीविभाग मा . कांबळे साहेब, या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन उपस्थित नागरिकांना लाभले.

महसूल विभागाच्या या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा सुलभ पद्धतीने मिळाल्याने शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला.

## महाराणा प्रताप सिंह यांना औसा येथे अभिवादन



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**औसा । महेश कोळी**

भारत मातेच्या स्वाभिमान आणि पराक्रमाचे मूर्तिमंत प्रतीक वीर शिरोमणी योद्धा महाराणा प्रताप सिंह यांच्या जयंतीनिमित्त औसा येथील राजपूत समाजाच्या वतीने हनुमान मंदिर चौक येथे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिनंदन अभिवादन करण्यात आले यावेळी राजपूत समाजाचे अध्यक्ष संतोष सिंह वर्मा माधव सिंह परिहार धर्मेंद्र बीसीने वीरशैव समाजाचे अध्यक्ष सुभाष आप्पा मुक्ता पप्पू गवळी फर्टीलायझर्स असोसिएशनचे अध्यक्ष जयराज कारंजे जयराज ठाकूर भरत सूर्यवंशी दत्ता पुंड नगरसेवक गोविंद जाधव यांच्यासह विविध समाजाचे अध्यक्ष व शहरातील नागरिक उपस्थित होते

## अनुराग सावंत यांचे शालांत परीक्षेत उज्वल यश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**औसा । महेश कोळी**



श्रीराम माध्यमिक विद्यालय एरंडी सारोळा चे उपक्रमशील शिक्षक नेताजी सावंत यांचे सुपुत्र अनुराग नेताजी सावंत यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश संपादन करून सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे श्रीकिशन सोमानी विद्यालयातून अनुराग सावंत यांनी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश संपादन केल्याबद्दल आपल्या यशाचे श्रेय त्यांनी विद्यालयाचे मुख्याध्यापक व मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकासह आई-वडिलांना दिले आहे अनुराग नेताजी सावंत यांनी शैक्षणिक क्षेत्रात उज्वल यश संपादन केले असले तरी कला क्रीडा क्षेत्रातही ने पुण्य प्राप्त केले आहे चित्त थरारक योगासने प्राणायाम जलतरण आणि कराटे स्पर्धेतही अनुवाद निपुण आहे त्याच्या यशाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनराज जाधव तंटामुक्तीचे अध्यक्ष आकाश पाटील सरपंच राहुल पाटील पतंजली योग समितीचे सर्व पदाधिकारी औसा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष काशिनाथ सगळे पत्रकार राम कांबळे विनायक मोरे इलियास चौधरी काजी मुक्तार मणियार विठ्ठल पांचाळ बालाजी उबाळे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत




# राजकीय लग्नसराई! पारा ४२ अंशांवर; इच्छुकांची धावपळ

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**किनवट । शेख शौकत**

सध्या लग्नसराईचे दिवस सुरू असून, या शुभकार्याचा फायदा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील इच्छुकांनी घेतल्याचे चित्र किनवट तालुक्यात पाहायला मिळत आहे. ओबीसी आरक्षणाचा तिढा अद्याप सुटलेला नसला, तरी निवडणुकांचे वारे मात्र आतापासूनच वाहू लागले आहेत.

सध्या उन्हाचा तडाखा

प्रचंड वाढला असून तापमान ४२ डिग्री सेल्सिअसच्या पार गेले आहे. २९ एप्रिलपासून सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत घराबाहेर पडू नये, खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे. मात्र, या कडाक्याच्या उन्हाची तमा न बाळगता राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि भावी उमेदवार लग्नमंडपात आपली हजेरी लावताना दिसत आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या ज्याला ग्रामीण राजकारणाचे मिनी मंत्रालय म्हटले जाते त्या निवडणुका होतील, अशी आशा इच्छुकांना होती.

मध्यंतरी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांचे कोणतेही चिन्ह दिसत नसल्याने अनेकांचा हिरमोड झाला होता. मात्र, आता ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने इच्छुकांनी पुन्हा कंबर कसली निवडणुकीचे डोहाळे लागले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.



### शुभमंगल सावधान म्हणत प्रचार सुरू

निवडणुकीला अजून सहा-सात महिन्यांचा कालावधी शिल्लक असतानाही, इच्छुकांनी ज्या पद्धतीने आपला जनसंपर्क वाढवला आहे त्यामुळे नेत्यांना आतापासूनच निवडणुकीचेडोहाळे लागले आहेत, अशी चर्चा रंगू लागली आहे. ओबीसी आरक्षणाचा तिढा सुटण्याची वाट न पाहता इच्छुकांनी 'शुभमंगल सावधान' म्हणत प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. आगामी काळात हे राजकीय वातावरण तापण्याची चिन्हेआहेत. प्रत्येक लग्नसोहळ्याला उपस्थित राहून वधू-वरांना शुभेच्छा देतानाचे फोटो तत्काळ फेसबुक आणि व्हॉटसअँप स्ट्रेटसवर झळकतआहेत.